# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


परीक्षा गोदाम विभाग (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) Exam Godown
गणेशखिंड, पुणे ४११००७ SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY Ganeshkhind Pune 7.
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१४६२ (Formerly University of Pune) Contact : 020-25621462
Website: www.unipune.ac.in e-mail: godown@pun.unipune.ac.in


जा.क्र. पगो/२०२५/८२ **महत्वाचे व तातडीचे** दि. ०९/०९/२०२५

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

(विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र)

विषय : हिवाळी सत्र परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मधील आयोजित करावयाच्या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्यांच्या मागणीबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षा विभागाकडून हिवाळी सत्राच्या (ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२५) परीक्षांसाठी आपणांस आवश्यक असलेल्या साहित्यांचे/स्टेशनरीचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील परीक्षेच्या साहित्यांची मागणी ऑनलाईन पद्धतीने **दिनांक:२४/०९/२०२५ ते दिनांक:०४/१०/२०२५ या कालावधीत करावी**. ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणांस घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच परीक्षा गोदाम कक्षाने मान्य केलेल्या स्टेशनरी व्यतिरिक्त परीक्षा चालू असताना अतिरिक्त स्टेशनरी लागल्यास ती देखील ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येईल. तरी **दिनांक:०४/१०/२०२५** नंतर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने स्टेशनरीची मागणी न दिल्यास त्यांना स्टेशनरी वितरीत करणे शक्य होणार नाही. अशावेळी महाविद्यालयास स्वत:हून अशी स्टेशनरी विद्यापीठातून घेऊन जावी लागेल.

हिवाळी २०२५ सत्रान्त परीक्षेपूर्वी उन्हाळी सत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२५ च्या विद्यापीठ परीक्षांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे गोदाम कक्षात आणून जमा करु नयेत. सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयात परीक्षा कस्टडीमध्ये ठेवावेत व विद्यापीठ प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. सबब महाविद्यालयांनी ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ करिता ऑनलाईन स्टेशनरी मागणीपत्र भरताना ऑनलाईन पध्दतीने फॉर्मनुसार माहिती अचूक भरणे आवश्यक आहे, याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्यानुसार तसेच परीक्षांमध्ये राजेश अग्रवाल यांच्या शिफारशीनुसार व अनुषांगिक शासन निर्णयास अनुसरून सर्व विद्यापीठ अंतिम परीक्षाकरिता ७० गुणांसाठी ३६ पानी उत्तरपत्रिका, ३५/४०/५० गुणांसाठी २४ पानी उत्तरपत्रिकांचा वापर करणे बंधनकारक असून या सर्व परीक्षांना पुरवणी उत्तरपत्रिका देण्यात येऊ नयेत, याची कृपया आपल्या स्तरावर नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी. यास्तव सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, त्यांच्याकडील सध्या शिल्लक असलेल्या उत्तरपत्रिका, सेंटीमीटर ग्राफ, ड्रॉईगशीट यांचा पुर्णत: वापर होईल याची कृपया दक्षता घ्यावी.

ऑनलाईन पध्दतीने अंतिम परीक्षा/इनसेम परीक्षा उत्तरपत्रिका मागणी फॉर्म भरण्यासाठी आवश्यक सूचना : —

१) Examination → College Login → Stationary Requisition

२) College / Department Login

३) BCUD User Name → Password → Login

४) Available Stock Entry → Submit

५) Exam Stationary Requisition Application

६) Dashboard → Application Confirm

ऑनलाईनद्वारे संपूर्णपणे माहिती भरलेल्या मागणी पत्राची प्रिंट काढून झाल्यावर, त्या मागणी पत्रासोबत महाविद्यालयाने प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक यांच्या स्वाक्षरीने महाविद्यालयाचे पत्र जोडून त्यावर महाविद्यालयाचां (**Puncode**) पनकोड, प्राचार्य किंवा परीक्षेचे काम पाहणा—या व्यक्तीचे नाव व मोबाईल नंबर इ. चा उल्लेख स्पष्टपणे करुन ती हार्ड कॉपी परीक्षा गोदाम विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे.

वरील नमूद केल्यानुसार परीक्षेच्या साधनसामुग्री बाबतची कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ